● सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सहकार चळवळ ही आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा- आ. खोतकर

### सहकार दिंडीचे जालन्यात स्वागत; भव्य शोभायात्रेत सहकाराच्या महाकुंभाची अनुभूती

**जालना । प्रतिनिधी -** सहकार चळवळ ही आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा आहे. शेतकरी, लघुउद्योग, महिला, तरुण आणि गरीब वर्गासाठी ही चळवळ मोठा आधार ठरली आहे. सहकार चळवळीमुळे अनेक गोरगरीब कुटुंबांना स्वावलंबी होण्याची संधी मिळाली असून, सहकारी पतसंस्था, बँका, दूध संघ, कृषी प्रक्रिया उद्योग आणि विविध सहकारी संस्थांमुळे जनतेला रोजगार आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. सहकारी पतसंस्था आणि बँकांपुढे अनेक अडचणी असतानाही त्या तग धरून आहेत. अशा परिस्थितीत ही चळवळ मजबूत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन सहकार दिंडीचे स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना केले.

संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले असून, त्यानिमित्त ८ आणि ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या जनजागृतीसह सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी राज्य पतसंस्था फ ेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेली नागपूर ते शिर्डी स्व. वैकुंठभाई मेहता सहकार दिंडी १ फेब्रुवारी रोजी रात्री महेश भवन येथे मुक्कामी आल्यानंतर स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांच्याहस्ते स्वागत करण्यात आले, त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर छत्रपती संभाजीनगर विभागीय सहनिबंधक शरद जरे, जिल्हा उपनिबंधक परमेश्वर वरखडे, पतसंस्था फेडरेशनचे राज्य अध्यक्ष काकासाहेब कोयटे, खजिनदार दादाराव तुपकर, सहकार दिंडी प्रमुख सुदर्शन भालेराव, सहकार भारतीचे अध्यक्ष सचिन वाणी, उपाध्यक्ष प्रसन्ना जाफराबादकर, पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, संचालक राजाभाऊ देशमुख, प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेचे संस्थापक तथा माजी आमदार ड. विलासराव खरात, अध्यक्ष भूषण भक्कड, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन सतीश टोपे, जालना पिपल्स बँकेचे संचालक सतीश पंच, अशोक पांगारकर, विष्णू पाचफुले, पंडितराव भुतेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आ. खोतकर पुढे म्हणाले की, सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या या मंडळीच्या मनात समाजाप्रती वेगळा भाव पाहायला मिळतो. जनतेचे कल्याण व्हावे, हा त्यांचा उद्देश आहे. ज्यांची पत नाही त्यांची पत निर्माण करणारे सहकार हे क्षेत्र आहे. देणारे हात म्हणून सहकाराकडे पाहिले जाते. अर्थपुरवठा करते तेव्हा ही मंडळी हवीहवीशी वाटते. मात्र, वसुलीसाठी जातात तेव्हा ही मंडळी नकोशी वाटू लागते. जनतेने वेळेवर कर्ज परतफेड केली तरच सहकार चळवळ मजबूत बनेल. या क्षेत्राच्या अनेक अडचणी आहेत. तुमच्या अडचणी आपापल्या जिल्ह्याचे खासदार, आमदारांकडे लेखी स्वरूपात दिल्यास त्यावर सभागृहात आवाज उठविता येईल. त्यातील मीदेखील एक असेल, असे सांगून समजून घेणारे व उपाययोजना करणारे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री म्हणून राज्याला लाभले आहेत. त्यांच्या पातळीवरील समस्या ते निश्चितच सोडवीतील, असे आ. खोतकर म्हणाले.

विभागीय सहनिबंधक शरद जरे म्हणाले की, श्रीमंत



आणि गरीब अशी दोघांमधील दरी कमी करण्याची ताकद सहकार चळवळीत आहे. ड. विलासराव खरात यांनी बदलत्या परिस्थितीनुसार सहकारी संस्थांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार असल्याचे स्पष्ट केले. प्रास्ताविकपर भाषणात जिल्हा उपनिबंधक परमेश्वर वरखडे म्हणाले की, सहकार दिंडीमुळे सहकार क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले आहे. ८ आणि ९ फ ेब्रुवारी रोजी शिर्डी येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत १६ देशांचे प्रतिनिधी, सहकार क्षेत्रातील १० हजार प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, या परिषदेला अर्ध्यावर मंत्रिमंडळ उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पतसंस्था फ ेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

आज रविवार दि. २ फ ेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात सहकार दिंडीचे स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते सहकार ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पतसंस्था फेडरेशन, सहकार भारतीचे पदाधिकारी व सदस्यांसह माजी आमदार राजेश टोपे, भास्करराव दानवे, राज्य पतसंस्था फ ेडरेशनचे खजिनदार दादाराव तुपकर, जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष विठ्ठल पवार, राजेश राऊत, राजाभाऊ देशमुख, बाजार समितीचे संचालक अनिल सोनी, समर्थ बँकेचे सरव्यवस्थापक विजय कनुजे, आदींची उपस्थिती होती. त्यानंतर हिरवी झेंडी दाखवून आ. खोतकर यांनी शोभायात्रेचा शुभारंभ केला. या शोभायात्रेत सहकार क्षेत्रातील २५ चित्ररथ होते. ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. स्वागत कमानी, रांगोळ्या आणि जय सहकारच्या पान २ वर

मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समिती कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी करणराजे जाधव




**जालना । प्रतिनिधी -** विश्ववंदनीय, कुळवाडीभूषण, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त मराठा क्रांती मोर्चा प्रणित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी करण राजे जाधव, स्वागताध्यक्ष ॲड. आनंद झा, कार्याध्यक्ष सागर पाटील, सचिवपदी ॲड. लक्ष्मण उढाण, किरण शिरसाठ, अंकुश पाचफुले यांची निवड करण्यात आली आहे .

आगामी शिवजन्मोत्सव समिती निवडीसाठी रविवारी ( ता.0२) मराठा सेवा संघाच्या सभागृहात राजेश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली, बैठक घेण्यात आली.यावेळी विष्णू पाचफुले, प्रा. राजेंद्र भोसले, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जगन्नाथ काकडे, डॉ. संजय लाखे पाटील, मावळते अध्यक्ष अशोक पडूळ, डॉ. धनसिंह सुर्यवंशी, राजेंद्र जाधव, ॲड. शैलेश देशमुख, संतोष कऱ्हाळे, बंडू एखंडे, ॲड.ईश्वर बिल्होरे, शक्ती राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिवजन्मोत्सव सामाजिक उपक्रमांनी साजरा करावा. अशा सूचना बैठकीत करण्यात आल्या. विविध विषयांवर चर्चा, विचार- विनीमय करून सर्वानुमते समिती गठित करण्यात आली. ती पुढील प्रमाणे उपाध्यक्ष: आकाश जगताप, शुभम टेकाळे, साई पाचफुले, सहसचिव : गजानन काळे, योगेश सोळंके, बाळासाहेब देशमुख, कोषाध्यक्ष : ॲड. सुनील काळे, प्रविण पाचफुले, यांचा समावेश आहे. नूतन कार्यकारिणीचा यावेळी पान २ वर

## राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीसपदी भरत मानकर यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी भरत मानकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी भारतीय मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष श्री शरद गोरे, माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांच्या शिफारशीवरून केली आहे. नियुक्तीचे पत्र माजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते भरत मानकर यांना देण्यात आले.

सामाजिक क्षेत्रात मराठा सेवा संघ प्रणित संभाजी ब्रिगेड या संघटेनेच्या जिल्हाध्यक्ष पदापाससून ते राज्य कार्यध्यक्षपदावर संघटनात्मक बांधणी करण्याचे काम भरत मानकर यांनी उत्कृष्टरित्या केलेले आहे. जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगर सेवा सहकार संस्था स्थापन करून युवकांना स्वतः च्या पायावर उभे करण्याचे काम त्यांनी केले आहे आणि करत आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांनी सा. तुकावाणी, सा. शिवधर्म, मा. मराठा मार्ग, दै. जनपत्र, दै. तात्काळ राज्यवार्ता, दै. जनश्वास आदी वृत्तपत्रांमध्ये जिल्हा प्रतिनिधी ते संपादक पदावर विविध जबाबदार्या त्यांनी पार पाडल्या आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे मराठवाडा कार्याध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. भरत मानकर यांच्या सामाजिक कामाची दखल



घेऊन प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी युवा नेते भरत मानकर यांची म हाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरित्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी महाराष्ट्रातील जिल्ह्या जिल्ह्यात सर्व समाज घटकातील नागरिकांना सोबत घेऊन राष्ट्रवादी पक्षाची योग्य बांधणी करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार शरदचंद्र पवार यांचे विचार सर्व दूर पोहोचण्यासाठी प्रयत्नशील राहून पक्ष संघटन मजबूत करण्याचे कार्य करावे असे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

त्यांच्या या निवडीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता डॉ. शरद गोरे, म ाजी मंत्री आ. जितेंद्र आव्हाड, खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार चंद्रकांत दानवे, जिल्हाध्यक्ष निस ार देशमुख, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन सतीश टोपे, प्रकाश बोर्डे, एस. एस. खरात, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी, युवक जिल्हाध्यक्ष पंकज बोराडे, मनोज म रकड, कपिल आकात, प्रा. सोपानराव तेलगड, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, अनिल खंदारे, प्रा. संजय जाधव, विष्णू कदम, कल्याण सपाटे, कैलास भोरे, पान २ वर

## प्राथमिक शिक्षकांचे समायोजन रद्द करा

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे डॉ. रविंद्र काकडे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांची समायोजन प्रक्रिया राबविणार आहे. या समाजात प्रक्रियेला अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने विरोध करण्यात आला. १८ मे २०११ च्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार आदी मुख्याध्यापक केंद्रप्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती केल्यानंतरच नोव्हेंबर महिन्यापर्यंत समाजात प्रक्रिया राबवली पाहिजे. जिल्हा परिषदेत पदोन्नती प्रक्रिया न करताच समायोजन प्रक्रिया होत आहे. ही अत्यंत चुकीची आणि नियमाचे पाय मल्ली करणारी पद्धत आहे. त्यामुळे नियमानुसार आधी पदोन्नती त्यानंतरच समायोजन करण्यात यावे, अशी मागणी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कैलास दातखिळ यांच्याकडे करण्यात आलेली आहे. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष डॉ. रवींद्र काकडे, म हिला विंगच्या अध्यक्षा सीमाताई काकडे, अरुण साबळे, संजय भवर, भालचंद्र गंगाधरे, संदीप गवई व सतीश बोर्डे यांची उपस्थिती होती.

## पत्रकार प्रा.सुभाष जिगे यांना उपक्रमशील शिक्षक पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन व भूगोल विषयाची रुची निर्माण करण्यासाठी केलेले मार्गदर्शन तसेच विद्यार्थी हित लक्षात घेऊन भूगोल प्रज्ञाशोध केंद्रामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेसाठी सक्रीय सहकार्य केल्याबद्दल अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव येथील रहिवासी तथा कर्जत येथील राजुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.सुभाष विठ्ठलराव जिगे यांना नुकताच 'उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार २०२४ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.मानचिन्ह , प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पुरस्काराबद्दल प्रा.जिगे यांचे शेतीनिष्ठ शेतकरी पांडुरंग तात्या डोंगरे, सचिव डॉ.राहुल पाटील डोंगरे, शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे, डायटचे प्राचार्य डॉ राजेंद्र कांबळे, गटविकास अधिकारी गोविंद चव्हाण, प्रा .बटुळे, प्राचार्य विलास टकले, प्रा.ओमप्रकाश घुगे,प्रा.भरत शेरे, अंकुश वीर, धनाजी जाधव, सचिन टेकाळे , सुनिल चव्हाण , सुंदर बुनगे, वैभव मुळी, ज्ञानेश्वर पैठणे , अभिजीत उंडे , शिक्षकेत्तर कर्मचारी भिकन कोकणी, अशोक उगले, विलास घुले, वाल्मीक सपकाळ , विष्णू घुगे व गावकरी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.



# संपादकीय पान

## महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी!

भारतीय पुरुषांचा क्रिकेट संघ इंग्लंड विरुद्ध टी २० मालिका खेळत आहे त्यामुळे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष त्या संघाकडे लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा १९ वर्षाखालील संघ मलेशियातील क्वालालंपूर येथे टी २० चा विश्वचषक खेळतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांची इंग्लंड विरुद्ध द्विपक्षीय मालिका चालू असताना भारत या मालिकेत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते मात्र मलेशियातील क्वालालंपूर येथे माहिलांचा १९ वर्षाखालील टी २० चा विश्वचषक चालू होता हे किती लोकांना माहीत होते ? याच विश्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी अजिंक्यपद मिळवून विश्वक्रिकेटवर आपली मक्तेदारी सिद्ध केली. क्वालालंपूरच्या बायुमास ओव्हल येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी जबरदस्त खेळ करत दक्षिण आफ्रिकन महिला संघाचा धुव्वा उडवत विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी जबरदस्त गोलंदाजी करून दक्षिण आफ्रिकेला अवघ्या ८२ धावत गुंडाळून अवघ्या ११.२ षटकात ८४ धावा काढून ९ गडी राखत एकतर्फी विजय मिळवला. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी एकहाती वर्चस्व गाजवले. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय महिलांनी हुकूमत गाजवून दक्षिण आफ्रिकन महिलांना दाती तृण धरायला लावले. हा सामना जिंकून भारतीय महिलांनी सलग दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरले. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे हे केवळ दुसरे विश्वविजेतेपद आहे. याआधीच्या म्हणजे २०२३ साली झालेल्या १९ वर्षाखालील महिलांच्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी इंग्लंडचा पराभव करून विश्वविजेतेपद मिळवले होते. सलग दोनदा विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारताच्या या १९ वर्षाखालील मुलींची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे. विशेष म्हणजे भारताच्या वरिष्ठ महिला संघाला अजूनही अशी कामगिरी करता आलेली नाही . भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते मात्र भारताच्या या युवा महिला खेळाडूंनी ही अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वानाच चकित केले आहे. भारताच्या या १९ वर्षाखालील महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या युवा महिला खेळाडूंच्या या कामगिरीचा देशातील १४४ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच निक्की प्रसादच्या या संघाने करून दाखवले आहे. सलग दुसऱ्यांदा टी २० चा विश्वचषक जिंकून भारताच्या या युवा महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या युवा खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या वरिष्ठ महिला संघाने देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात अजूनही गांभीर्याने घेतली जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. सलग दुसऱ्यांदा टी २० च्या विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या १९ वर्षाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! जय हो!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

#### सहकार चळवळ ...

जयघोषामुळे परिसर दुमदुमून गेला. सर्वात समोरील राज्य पतसंस्था फेडरेशनच्या चित्ररथावर सहकार चळवळीवर आधारित पथनाट्य आणि वारकरी भजनी मंडळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रस्त्यावर अनेक ठिकाणी चहा, पाणी आणि नाश्त्याची सेवा पुरविण्यात आली. ही शोभायात्रा यात्रा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बडी सडक, सदर बाजार पोलीस स्टेशन, मामा चौक, महावीर चौक, मुथा बिल्डिंग, मस्तगड, गांधी चमन, शनी मंदिर, कचेरी रोडने जाऊन मुक्तेश्वर लॉन्स येथे समारोप झाला. त्यानंतर सहकार दिंडी पुढील प्रवासासाठी छत्रपती संभाजीनगरकडे मार्गस्थ झाली. शोभायात्रेत जालना जिल्ह्यातील बँका पतसंस्थेचे अधिकारी, कर्मचारी हजारोच्या संख्येने सहभागी झाल्याने सहकाराचा महाकुंभ दिसून आला.

#### अध्यक्षपदी करणराजे ...

सत्कार करण्यात आला. बैठकीस ॲड. ए. डी. इंगळे, ड.एस. डी. पाखरे, ड.निरज धन्ने, विश्वजित वाढेकर, अर्जुन गायकवाड, अशोक भगुरे , विजय हजारे ,राहुल राऊत, सतीश प्रभारी , योगेश बिल्होरे, कार्तिक लुंगे , सूर्यप्रकाश जाधव, लक्ष्मण गाडेकर, रवीकुमार सुर्यवंशी, गणेश सोळंके, राम नागरे, यांच्यासह शिवप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

#### राष्ट्रवादीच्या प्रदेश ...

जयाजी देशमुख, प्रशांत तेलगड, ॲड. संजय काळबांडे, शेख फारूक, कैलास काकडे, कैलास मगरे, महादेव आघाव, सुंदर साळवे, शिवराज जाधव आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# समन्वित योग शिबीराचे आयोजन

## मनपा व पतंजलि योग समितीचे संयुक्त उपक्रम, मनपा कर्मचाऱ्यांनी मार्किंग करत घेतला आढावा





**जालना । प्रतिनिधी-** शहरातील कल्याणराव घोगरे क्रिडा संकुल येथे समन्वित योग शिबीराचे आयोजन सोमवार (दि ३) ते शुक्रवार (दि ७) फेब्रुवारीपर्यंत सकाळी ६ ते ७.३० वाजेदरम्यान करण्यात आले आहे. जालना शहर महानगर पालिका व पतंजलि योग समितीच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीराच्या पुर्वतयारीसाठी मनपा प्रशानातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवार (दि २) रोजी मार्किंग सह इतर कामांचा आढावा घेत कामे केली. या शिबीरात शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मनपा आयुक्तांसह पतंजलि समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीराच्या माध्यमातून ताणतणावापासून मुक्ती, शारिरीक तंदुरूस्ती, हृदयाचे आरोग्य, मधुमेहावर नियंत्रय, अंतर्यातमी शांतता व उर्जा शक्ती वाढ, वजनावर नियंत्रण, रोग प्रतिकारक शक्तीत वाढ, शरीराची लवचिकता आणि सदृढता यासह विविध प्रकारच्या व्याधी पासून मुक्ती मिळवण्यासाठी योग महत्त्वाचा आहे. यासाठी शिबीरात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. शिबीरादरम्यान, महिला व पुरुषांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे. योग मॅट व पाण्याची बॉटल सोबत आणण्याचे आवाहनही आयोजकांनी केले आहे.

# नरवीर तान्हाजी मालुसरे पुण्यतिथी निमित्त शौर्यदिन कार्यक्रम

**मुंबई -** हिंदवी स्वराज्यासाठी लाविली प्राणाची बाजी । मानाचा मुजरा त्यांसी ते मालुसरे तान्हाजी -सूर्याजी ।। असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात सुवर्णाक्षराने ज्याची नोंद झाली आहे. त्या सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी मुंबईत एकता नगर सर्व्हिस रोड, ब्रिजवासी स्वीट समोर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०००६७ येथे ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ वा शौर्यदिन म्हणून साजरी करण्यात येत आहे. भारतीय सैन्यदलात मराठा रेजिमेंट, भारतीय लष्कर, भारतीय नौदल व भारतीय वायुदल यामध्ये उच्च पदावर सशस्त्र कामगिरी केलेल्या निवृत्त सैन्याधिकाऱ्यांचा आणि पोलादपूर तालुक्यातील निवृत्त सैनिकांचा हृदय सत्कार करण्यात येणार आहे.

सुप्रसिद्ध लेखिका वीरमाता अनुराधा गोरे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत आणि त्यांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे शूरवीर मावळे ते भारतमातेचे पराक्रमी सुपुत्र या विषयावर व्याख्यान होणार आहे.

यावेळी निवृत्त विंग कमांडर शशिकांत ओक यांनी अभ्यासांती बनवलेली नरवीर तानाजी मालुसरे यांची सिंहगडावतील शौर्यगाथा यावर आधारित लढाईचे बारकावे टिपणारी चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात येणार आहे. तर रणझुंझार शिवशंभू शाहिरी पथक ठाणेचे शाहिर रोशन मोरे यांचा पोवाड्यांचा कार्यक्रम होणार आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज आणि सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या चित्रांवर आधारीत झालेल्या रंगभरण चित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे. विभाग प्रमुख श्री अजितदादा भंडारी, महिला विभाग संघटिका सौ. मनाली ताई चौकीदार, विधानसभा प्रमुख श्री. संतोष राणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सुभेदार तान्हाजी मालुसरे यांचा पराक्रम आणि स्वामीनिष्ठा आजवरच्या बखरकारांना, इतिहासाच्या अभ्यासकांना, ललित लेखकांना, चित्रपट व नाट्य निर्माता दिग्दर्शकांना आणि अभिनय करणाऱ्या कलाकाराना सतत प्रेरणादायी ठरला आहे, देशातील अनेक जण या अद्वितीय पराक्रमी सामर्थ्यवान पुरुषोत्तमाचे चरित्र अभ्यासून भारावले गेले आहेत, आणि ह्या वीरपुरुषाचे वेगवेगळे पैलू लोकांसमोर मांडले आहेत, यापुढेही ते मांडत राहाणार आहेत, कारण शिवचरित्र अखंड 'प्रेरणादायी' तर शिवरायांना जिवाभावाची साथ देणारे प्रसंगी बलिदान देणारे त्यांचे मावळे म्हणजे जगाच्या इतिहासात पहिल्यांदा 'गनिमी कावा' अवलंबणारे पराक्रमाचे आणि धाडसाचे एक एक सोनेरी पान ! छत्रपती शिवाजी राजांच्या चरणी आपली निष्ठा ठेवण्यासाठी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणारा एक रांगडा तरुण शिवरायांच्या पदरी सामील होतो काय अन त्यांच्याशी इतका समरस होतो काय, की स्वतःच्या मुलाचं लग्न काढलं असताना सिंहगड मोहिमेचा सांगावा आल्यानंतर हा धैर्याचा मेरुपर्वत काळासारखा धावून जातो अन वचनाच्या पूर्ततेसाठी मागे न हटता आपला अमोल देह स्वामीनिष्ठेचरणी अर्पण करीत धारातीर्थी पडतो काय.? आपले भारतीय सैन्य सुद्धा देशाचे संरक्षण करताना याच भावनेतून सीमेवर खडा पहारा देत असते. या कार्यक्रमाचे महत्व ओळखून मुंबईतील शिवप्रेमीसह नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक विजय मालुसरे (शाखाप्रमुख क्र. २०) आणि अनिल ज्ञानोबा मालुसरे (पोलादपूर तालुकाप्रमुख) यांनी केले आहे.



# नांदेड़ येथे आयोजित राज्यस्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत सेठ ईबीके उर्दू विद्यालय राज्यात तीसरा

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी 'खादमिन ए उम्मत ग्रुप नांदेड़' यांच्या वतीने नांदेड़ येथे आयोजित राज्य स्तरीय प्रश्न मंजूषा (सीरत क्विज कंपटीशन) या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील सेठ एकनाथ भगवान दास काबरा उर्दू माध्यमिक विद्यालयाने तीसरा क्रमांक पटकविला आहे.

२ दोन फेब्रुवरी रविवार रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हैदर गार्डन नांदेड़ येथे ही भव्य स्पर्धा घेण्यात आली ज्यात महाराष्ट्रातील नांदेड़, लातूर, वाशिम, अमरावती, संभाजीनगर, उदगीर, बुलढाणा, मुंबई, सोलापुर, जळगांव, ठाणे, नाशिक, परभणी आदि जवळपास पंचवीस जिल्ह्यातील स्पर्धक विद्यार्थी सहभागी होते.या स्पर्धेत सेठ ई बी के उर्दू विद्यालयाच्या विद्यार्थिनी सबा रहेमान कुरेशी, अल्फिया रहेमान कुरेशी व अदीबा फेरोज़ शाह यांनी क्रमशः जिल्ह्यात प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवित राज्यस्तरीय स्पर्धेत जालना जिल्ह्याचे नेतृत्व करीत राज्य स्तरावर ही तृतीय क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशा बद्दल संस्थेचे अध्यक्ष देवराव देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, संस्थेचे सचिव नंदलाल काबरा, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रेमसुख काबरा, संचालक दत्तात्रेय देशमुख, ठमाजी भागवत, मुख्याध्यपक सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे. या विजेत्या विद्यार्थिनींना सह शिक्षक शेख़ साबेर यांचे मार्गदर्शन लाभले.

# जालन्याच्या निधोना येथून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांचं काम बंद आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** दिनांक २ रविवार रोजी दुपारी तीन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालन्याच्या निधोना येथून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांनी पगारवाढ पाहिजे, झऋ आणि एङखउ चा योग्य तो लाभ भेटला पाहिजे, झधच-छढ डङएएझ मिळाली पाहिजे, कंपनी चे गजखछखछऋ डएढढएठ मिळाले पाहिजे, कर्मचारी संख्या वाढली पाहिजे, कर्मचारी सुरक्षा भेटली पाहिजे. या मागण्यासाठी काम बंद आंदोलन सुरू केलय. या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा आजचा पाचवा दिवस असून जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तो पर्यंत आंदोलन मागे न घेण्यावर टोल प्लाझाचे कर्मचारी ठाम आहेत. टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन देऊन मानधनात वाढ करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी केलीय. टोल प्लाजा कर्मचाऱ्यांच्या संपामुळे समृद्धी महामार्गावर वाहने बिना टोलचे प्रवास करत आहेत. आता या मोफत मध्ये प्रवास करत असताना याचा भुर्दंड नेमका कोणाला बसणार आहे. शासनाला बसणार का वाहनधारकांना बसणार.. कारण काही लोकांच्या मते जालन्याहून गाडी नागपूरकडे जात असेल तर तिचा मुंबई ते नागपूर असा आनलाईन टोल आकारल्या जाणार आहे.अशा प्रकारे जर टोल आकारले जात असेल तर वाहन धारकांना विनाकारण भुर्दंड भरावा लागणार आहे.

# माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या तक्रा निवार बैठकीवर बहिष्कार

**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -**
मराठवाडा शिक्षक संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना, सदस्यांना तसेच उद्या होणाऱ्या तक्रार निवारण बैठकी मध्ये तक्रार केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की. उद्या मा. शिक्षणाधिकारी मंगला धुपे गायकवाड यांनी जी तक्रार निवारण बैठक राष्ट्रीय हिंदी विद्यालय जालना येथे ठेवली आहे. त्या बैठकीवर मराठवाडा शिक्षक संघाने बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.त्याचे कारण असे की , फक्त मराठवाडा शिक्षक संघानेच शिक्षणाधिकारी यांना ३१/१२/२४ रोजी जिल्ह्यातील शिक्षकांच्या व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी एक बैठक आयोजित करावी अशी विनंती केली होती. परंतु माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी जिह्यातील सर्वच संघटनांना सदरील बैठकीसाठी पत्र देऊन बोलावले आहे. मागणी फक्त मराठवाडा शिक्षक संघाचीच असताना इतर संघटनांना एकत्र बोलविल्या मुळे बैठकीत गोंधळ होवू शकतो व ज्या उद्देशाने बैठक आयोजित केली त्यात अडचण निर्माण होवू शकते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न , तक्रारी सुटणार नाही.असे ठाम मत मराठवाडा शिक्षक संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आहे. त्यामुळे संघटनेने बहिष्काराचा निर्णय घेतला आहे . शिक्षणाधिकारी यांनी ज्या संघटनेने विनंती केली त्यांचीच बैठक वेगळी घ्यावी. व समस्या सोडवाव्यात.

करिता उद्या कोणीही बैठकीस येवू नये असे आवाहन अध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते,मार्गदर्शक डॉ मारोती तेगमपुरे, डॉ पुरुषोत्तम जुन्ने, कार्याध्यक्ष बाबासाहेब बिडवे, फरकुंद अली सय्यद, उपाध्याक्ष भिमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण, दीपक शेरे, प्रद्युम्न काकड, जालना तालुकाध्यक्ष बी डी शेख, मार्गदर्शक शिवाजी केदार, प्रशांत वाघ, अंबड तालुकाध्यक्ष रमेश गाढे, सचिव गणेश मेहेत्रे, मार्गदर्शक अंनतराव जायभाये, विष्णु इप्पर, कैलास मान्टे भोकरदन तालुकाध्यक्ष आनंद वाघ, सरचिटणीस जनार्धन कुदर, जाफ्राबाद तालुकाध्यक्ष सुधाकरराव डोईफोडे,सचिव बबन लंके, मार्गदर्शक दत्ता देशमुख, गजानन बुधवत, परतुर तालुकाध्यक्ष विजयकुमार खरात, सचिव सोमदे, विजयकुमार म्हस्के,घनसावंगी तालुकाध्यक्ष शिवहारी कायंदे, सचिव राधेश्याम चौधरी, ज्ञानेश्वर पवार, बदनापूर तालुकाध्यक्ष सुनिल म्हस्के, सचिव सुरेश बनकर, युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, इम्रान सिद्धिकी, चरण बट्टेवार, अजित बारहाते, गणेश मुंडे, महिला शहराध्यक्ष ज्योती पांगारकर, शिरीन शहा शेख यांनी केले आहे

### राष्ट्रवादी-शिंदे गटात वादाची ठिणगी ?


# राष्ट्रवादीच्या ९० टक्के कार्यकर्त्यांनी काम केले नाही - रामदास कदम

**मुंबई** - विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर मंत्रिमंडळाचं वाटप, खातेवाटप आणि पालकमंत्री पदाचंही वाटप करण्यात आले. खातेवाटपानंतर आणि पालकमंत्री पदाच्या वाटपानंतर महायुतीमधील शिवसेना (शिंदे) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात रस्सीखेच सुरु असल्याचे बोलले जात होते. यातच अद्यापही रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरु आहे. या वादानंतर रायगडच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिलेली आहे.

दरम्यान, असं असतानाच आता शिवसेना (शिंदे) नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) कार्यकर्त्यांवर एक आरोप केला आहे. 'निवडणुकीत राष्ट्रवादीच्या ९० टक्के कार्यकर्त्यांनी योगेश कदम यांचं काम केलं नाही', असा आरोप रामदास कदम यांनी केला. एवढंच नाही तर आपण याबाबत सुनील तटकरे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिंदे गटात वादाची ठिणगी पडल्याची चर्चा रंगली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांचा उजवा हात असलेल्या गावांमध्ये देखील योगेश कदम यांना मते मिळालेली नाहीत. याबाबत मी सुनील तटकरे यांची भेट घेऊन सांगणार आहे. मात्र, असं असलं तरी आमचे कुठेही मतभेद नाहीत किंवा नाराजीही नाही. कारण सुनील तटकरे यांच्या मनामध्ये असं कदापि येणार नाही. याची मला कल्पना आहे. मात्र, सुनील तटकरे यांच्या कार्यकर्त्यांनी मग त्यामध्ये मंडणगड तालुका प्रमुख असेल किंवा दापोलीचा तालुका प्रमुख असेल, जवळपास ९० टक्के लोकांनी योगेश कदम यांचं काम केलं नाही. याचा अनुभव आम्ही निवडणुकीत घेतला. यासंदर्भात मी सुनील तटकरे यांच्याकडे लेखी तक्रार करणार आहे. त्यांनी याची दखल घ्यावी, असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते. रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या आरोपानंतर खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिलं. ते म्हणाले, शिवसेनेचे (शिंदे) नेते रामदास कदम हे जेव्हा माझ्याकडे तक्रार करतील तेव्हा मी नक्कीच त्यासंदर्भातील माहिती घेईल. कारण दापोली, खेड, मंडणगड, गुहागर हा विभाग माझ्या लोकसभा मतदारसंघात येतो. त्यामुळे रामदास कदम यांनी मला पत्र द्यावं. त्यांच्या पत्राची मी दखल घेईल. लोकसभा निवडणुकीत काय घडलं? विधानसभेच्या निवडणुकीत काय घडलं? याची माहिती मी घेईल, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी यादव तर सचिवपदी हजारे



**परतुर । प्रतिनिधी** - येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ची बैठक प्रवीण डुकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सर्वानुमते सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विजय यादव तर सचिवपदी अतुल हजारे, उपाध्यक्ष शुभम कटोरे, कोषाध्यक्ष संदीप शिंदे, सहकोषाध्यक्ष किशोर ठोंबरे, सहसचिव विठ्ठल सोनपावले, संघटक गोपी ठाकूर, यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार समिती मध्ये बाबाजी गाडगे, सुदर्शन सोळंके, शत्रुघ्न कणसे, विठ्ठलराव बरकुले, अमोल सुरूग, प्रवीण सातोणकर, संतोष हिवाळे, शामसुंदर चितोडा, सचिन खरात, नामदेव गोरे, वैजनाथ दादा बागल,प्रवीण डुकरे यांची निवड केली. बैठकीला मुरली सोनखेडकर, ऋषिकेश कराळे, सुनील गायकवाड, श्याम शिंदे, विष्णू मचाले, आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

# भाजपा जालना जिल्हा कार्यालयात नवनिर्वाचित पालकमंत्री ना.पंकजा मुंडे यांचा आयोजित जिल्हा बैठकीत सत्कार सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे आयोजित जिल्हा बैठकीत (दि.०१) प्रथम आगमन झाल्याबद्दल जालना भारतीय जनता पार्टीच्या संयुक्त विद्यमाने भव्य सत्कार सोहळा करण्यात आल.

या प्रसंगी आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.विलासबापू खरात, विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, सुनील आर्दड, विमलताई आगलावे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष सतीष जाधव, सोपान पेंढारकर, सर्जेराव जाधव, सिद्धिविनायक मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना सांगितले की, जालना जिल्ह्याचे पालकमंत्री होण्याचे भाग्य मला लाभले आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता सर्वांना सोबत घेउन जिल्ह्याला प्रगतीपथावर नेण्याचे व जिल्ह्याच्या विकासासाठी जे शक्य होईल ते प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी दिली.



यावेळी भाजपा सदस्य नोंदणी अंतर्गत ज्या पदाधिकाऱ्यांनी एक हजार सदस्य नोंदणी केली त्यांचा पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भास्कर (आबा) दानवे, शालिकराव म्हस्के, पुष्पाताई म्हस्के, सतीष जाधव, उमेश अग्रवाल, संतोष लोखंडे, कविता खोत, सुरेश दिवटे, दत्तात्रय पंडित, ज्ञानेश्वर भागिले, गणेश डोळस, अजिंक्य वाघ, अनिल सरकटे, राजू छल्लारे, राजू साळवे यांचा सत्कार केला.

यावेळी जालना जिल्ह्यातील व जालना महानगरातील सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, प्रभारी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विज्ञानापेक्षा मोठा चमत्कार नाही - डॉ सुदर्शन तारख



**जालना । प्रतिनिधी** - विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे, विज्ञानापेक्षा मोठा चमत्कार या जगात कोणीही करू शकत नाही, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ डॉ. सुदर्शन तारख यांनी केले.

बदनापुर तालुक्यातील सेलगाव येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेत ' विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि वस्तुस्थितीवर विचार प्रक्रिया' या विषयावर आयोजित व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अरविंद खरात,शालेय समितीचे अध्यक्ष कैलास अंभोरे, प्रा निलेश कुहिरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना डॉ. तारख यांनी विविध क्षेत्रांतील वैज्ञानिक ,शास्त्रज्ञ यांच्या कार्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनीही प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे असे आवाहन केले. विज्ञानापेक्षा मोठा चमत्कार या जगात कोणीही करू शकत नाही, आपल्या आजूबाजूला काही वेळा अंधश्रद्धेला वाव देणाऱ्या घटना घडत असतात परंतु विद्यार्थ्यांनी अशा अंधश्रद्धांना बळी पडू नये असेही त्यांनी सांगितले. इतिहासातील विविध जाती, धर्मातील संतांचे दाखले देत कशाप्रकारे वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवत संतांनी सुद्धा लोकांमध्ये अंधश्रद्धे विषयी जनजागृती केली याची अनेक उदाहरणे देत वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. आपण शिक्षणाच्या माध्यमातून शिकत असलेला वैज्ञानिक दृष्टिकोन प्रत्यक्ष आचरणात आणण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच विज्ञान शाखेतील अनेक करिअरच्या संधीची माहिती ही विद्यार्थ्यांना दिली.

यावेळी मुख्याध्यापक अरविंद खरात,शालेय समितीचे अध्यक्ष कैलास अंभोरे आदींनी आपले विचार व्यक्त केले.यावेळी, प्रकाश औंढेकर,राजेंद्र कायंदे,अशोक मुर्तडकर, जगत घुगे,चंद्रकांत पल्लये, राजू राजपूत, विनयकुमार जोशी, योगेश मोरे,दत्ता देवकर, ज्योत्स्ना बीडकर, मनिषा पाटील, सुनीता पडूळ, गोदावरी उगले,कल्पना साखरे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### इनरव्हील होरायझन उपक्रम

# दोन महिलांना शिलाई मशीन तर एका गरजूला झेरॉक्स मशीन प्रदान



**जालना । प्रतिनिधी** - इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्यावतीने प्रांतपाल शोभना पालेकर यांच्या उपस्थितीत रोजगारक्षम, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. दोन गरजू महिलांना शिलाई मशीन, एका व्यक्तीला झेरॉक्स मशीन, दोन व्हीलचेयर, एक कुबडी, प्रजासत्ताक दिनानिमित्त २० विद्यार्थ्यांना शालेय गणवेश तर चार शाळांना डायस भेट देण्यात आले.

प्रांतपाल शोभना पालेकर यांच्या क्लबच्या अधिकृत भेटीच्या निमित्ताने सॅफ्रॉन हॉटेलमध्ये बैठक पार पडली. या वेळी क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्डा आणि क्लबच्या इतर सदस्यांची उपस्थिती होती. या वेळी क्लबच्या माध्यमातून देवमूर्ती मराठी व उर्दू माध्यमाच्या दोन शाळा, खरपुडी आणि चौधरीनगर येथील जिल्हा परिषद शाळांना ४ डायस प्रदान करण्यात आले. याशिवाय, उटवद येथील चैतन्यपुरी जिल्हा परिषद शाळेतील २० विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शालेय गणवेश प्रदान करण्यात आले.

क्लबच्यावतीने महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येत आहे. त्या अंतर्गत दोन महिलांना शिलाई मशीन देण्यात आल्या, जेणेकरून त्या स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतील. तसेच एका गरजू व्यक्तीस उद्योगासाठी झेरॉक्स मशीन भेट देण्यात आली, यामुळे त्याला रोजगाराची संधी उपलब्ध होईल. तसेच दोन व्यक्तींना व्हीलचेअर तर एका व्यक्तीला कुबडी देण्यात आली.

या वेळी बोलताना प्रांतपाल शोभना पालेकर म्हणाल्या की, इनरव्हील क्लब केवळ एक संघटना नसून समाजसेवा हेच आमचे ध्येय आहे. शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मिती हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. अशा उपक्रमांमुळे अनेक गरजू लोकांना मदतीचा हात मिळतो. भविष्यातही आम्ही समाजसेवेसाठी अधिक सक्रिय राहू.

क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजातील गरजू लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच आमचे ध्येय आहे. भविष्यातही अशा विविध उपक्रमांचे आयोजन करून आम्ही अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करू.

# नांदेड शहरात आज आदिवासी महिलांच्या मेळाव्याचे आयोजन

**नांदेड । प्रतिनिधी** - मकर संक्रांतीचे औचित्य साधून आज ३ फेब्रुवारी रोजी शहरातील मालेगाव रोडच्या रेड्डी गार्डनमध्ये माजी दूरसंचार अधिकारी जयश्रीताई डोखळे यांच्या अध्यक्षतेखाली आंध आदिवासी महिला मेळावा,हळदी कुंकू व स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले असून सहाय्यक पोलीस निरीक्षक शालिनीताई नाईक यांची उपस्थित राहणार आहेत.नांदेड शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नंदाताई वाळकीकर, सविता वाळके, अनुसया धनवे, सुमनताई खोकले यांनी केले असून हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात महिलांना पुस्तकांचे वाण देण्यात येणार आहे. या मेळाव्यात आदिवासी महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रम घेण्यात येणार असून नृत्य,गायन, मूक अभिनय, भजन, खेळ व वक्तृत्व आदी कलाप्रकारांचेही सादरीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय विविध खाद्यपदार्थ व इतरही अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येणार असून सकाळी ११ ते सायं. ६ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमासह विविध वस्तूंची विक्री सुरू राहणार आहे. सावित्रीच्या लेकींचे असे कार्यक्रम होणे काळाची गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते गंगाधर वानोळे यांनी व्यक्त केले.

# वेळेवर वेतन मिळत नसल्याने टोल प्लाझाचे कर्मचारी संपावर

**जालना । प्रतिनिधी-** निधोना येथून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांनी पगारवाढ पाहिजे, PF आणि ESIC चा योग्य तो लाभ भेटला पाहिजे, PYMNT SLEEP मिळाली पाहिजे, कंपनीचे JOINING LETTER मिळाले पाहिजे, कर्मचारी संख्या वाढली पाहिजे, कर्मचारी सुरक्षा भेटली पाहिजे. या मागण्यासाठी काम बंद आंदोलन सुरू केलय. या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा आजचा पाचवा दिवस असून जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तो पर्यंत आंदोलन मागे न घेण्यावर टोल प्लाझाचे कर्मचारी ठाम आहेत. टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन देऊन मानधनात वाढ करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी केलीय. टोल प्लाजा कर्मचाऱ्यांच्या संपामुळे समृद्धी महामार्गावर वाहने बिना टोलचे प्रवास करत आहेत. आता या मोफत मध्ये प्रवास करत असताना याचा भुर्दंड नेमका कोणाला बसणार आहे. शासनाला बसणार का वाहनधारकांना बसणार.

### जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी संसदेचे उदघाटन

# महाविद्यालयीन निवडणुकांमधून युवकांना लोकशाही प्रणाली समजते - प्राचार्य डॉ.अग्निहोत्री

**जालना । प्रतिनिधी** - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या निवडणुका झाल्या पाहिजेत ,यामधून लोकशाही शासन प्रणाली युवकांना समजते, मतदार हा लोकशाहीचा राजा असतो , असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांनी केले .

जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थी संसदेच्या अध्यक्ष सचिव व विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देण्यात आली असून यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते ,प्रमुख पाहुणे श्री यश बगडीया व श्री धनीवाला होते. व्यासपीठावर युवा जल्लोष चे प्रमुख डॉ. गणेश कुलकर्णी व सांस्कृतिक व क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.हेमंत वर्मा तसेच विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री, सचिव राहुल चोरमारे, विद्यार्थीनीं प्रतिनिधी कु. तेजस्विनी राऊत आदींची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की महाविद्यालयाची शिस्त व नियमाचे काटेकोर पालन केले जाईल, विद्यार्थ्यांच्या समस्यासाठी मी सदैव तत्पर राहील, माझ्या काळात महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवीन, असे तन्मय अग्निहोत्रीनी सांगितले, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. तेजस्विनी राऊत हिने ही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री यश बगडीया म्हणाले की,विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये शिस्तीचे पालन करून ,सोबत अध्ययन



करावे. विद्यार्थी प्रतिनिधीनी आपला आदर्श इतर विद्यार्थ्यांसमोर ठेवावा,असे वर्तन करावे असेही श्री बगडीया यांनी सांगितले.

अध्यक्ष भाषण करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, महाविद्यालयीन निवडणुका झाल्याच पाहिजेत, यामुळे युवकांना लोकशाही समजते. लोकशाही मधील मतदार हा राजा असतो. या निवडणुकीमधूनच पुढे आमदार, खासदार, मंत्री होण्याची युवकांना संधी मिळते. आज जेईएस महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी , नगरसेवक, नगराध्यक्ष,आमदार ,खासदार मंत्री झाल्याचेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी नवनियुक्त सर्व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते, विद्यार्थी- विद्यार्थिनी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.बाबासाहेब वाघ यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. दीपवाल यांनी मानलेत

# साधुसंत जगाला दिशा देणारे, संतांनी सांगितलेल्या मार्गाने जाण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा - माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** साधू-संत समाजाला शिक्षण देऊन, धर्म प्रचार करून, समाजाच्या कल्याणासाठी काम करून समाजाला योग्य मार्गावर चालण्यास मदत करतात. साधू-संत समाजाला समतेचा विचार देतात. ते भेदभाव करणे चुकीचे असल्याची शिकवण देतात, धर्म प्रचार करतात, शास्त्रांचे ज्ञान मिळवून त्याचे लोकमध्ये प्रसार करतात, लोककल्याणासाठी काम करतात, राष्ट्र आणि धर्म यांची स्थिती सुधारण्यासाठी काम करतात, जगदोद्धारासाठी जीवन वेचतात. संत तुकाराम महाराजांनी साधुत्वाची खरी ओळख सांगितली आहे. साधुसंत जगाला दिशा देणारे, संतांनी सांगितलेल्या मार्गाने जाण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा तालुक्यातील तळणी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित काल्याच्या किर्तन प्रसंगी व तळणी गावांतर्गत पाईपलाईनचे उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रु. १,५००/- असा आर्थिक लाभ डीबिटि द्वारे दिला जातो. या लाडक्या बहिणींना सक्षम करण्यासाठी सरकारने पावले उचलली व या सर्व लाडक्या बहिणीमुळेच महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले त्यामुळे आता महिला सक्षमीकरणावर भर दिला जाणार असल्याचे देखील माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

ज्या लाडक्या बहिनींमुळे सरकार अस्तित्वात आल, त्यांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा खाली घेत परतुर विधानसभा मतदारसंघातील सर्व गावांमध्ये पिण्याचे शुद्ध फिल्टरचे पाणी देण्याचा संकल्प लवकरच पूर्ण होईल परतुर इथून १७६ गावांमध्ये तर मंठा येथून ९५ गावांमध्ये पाणीपुरवठा केला जाणार आहे प्रत्येक गावामध्ये गावांतर्गत पाईपलाईन पाण्याच्या टाक्या यांची उभारणी करण्यात आली असून माता भगिनींचा पाणी भरण्याचा त्रास यामुळे कमी होणार आहे. गावागावात पिण्याचे शुद्ध फील्टरचे पाणी मिळणार असून यामुळे आरोग्याच्या समस्या कमी होणार आहेत सर्व सामान्य नागरिकांना मागील ४० वर्षाचा राजकारणात कधी दारू पाजली नाही परंतु संपूर्ण मतदारसंघाला पिण्याचे शुद्ध फिल्टर पाणी पाजण्याचा संकल्प मात्र लवकरच पूर्ण करत आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

संत सेवा तरुण मंडळाच्या वतीने तळणी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आज काल्याचे किरन सेवा हभप विष्णू महाराज देशमुख यांच्याकडे होते अभंगाच्या निरूपणानंतर हभप विष्णु महाराज देशमुख व आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते १ कोटी रुपयांच्या गावांतर्गत पाईपलाईनचे उद्घाटन करण्यात आले मागील अनेक दिवसांपासून किरकोळ कारणांमुळे प्रलंबित असलेला गावांतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी पाईपलाईनचा विषय या निमित्ताने मार्गी लागला. यावेळी गावांतर्गत पाइपलाइन (१ कोटी रु), प्राथमिक आरोग्य केंद्र (६ कोटी रु), सभामंडप (६० लक्ष रु), महसूल मंडळ अधिकारी कार्यालय (५६ लक्ष रु) यासह अनेक विकास कामे तळणी व तळणी परिसरात करण्यात आले असल्याची माहिती देखील आमदार व मंडळ लोणीकर यांनी दिली.

तळणी मुख्य वडगाव शहरातला जाणारी ११० मिमी एचडीपीइ पाईपलाईन, शिरपूर व कोकरंबा या ठिकाणी जाणारी ११० मिमी एचडीपीई पाईपलाईन, त्याचप्रमाणे देवठाणा उसवत ११० मिमी एचडीपीई ५ किलोमीटर लांबीची पाईपलाईनचे उद्घाटन यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. ०३ लक्ष १० हजार लिटर क्षमता असणारी पाण्याची टाकी (किंमत ४० लक्ष) पाण्याच्या टाकीला जोडली जाणारी ०१ किलोमीटर लांबीची पाईपलाईन (२० लक्ष) यासह गावातील वितरण व्यवस्था १६० मिमी ते ७५ मिमी ११ किलोमीटर लांबीचे (४० लक्ष) पाईपलाईन कामाचे उद्घाटन यावेळी आमदार लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हभप विष्णू महाराज देशमुख, गणेशराव खवणे, पंजाबराव बोराडे, नवनाथ खंदारे, गजानन देशमुख, दारासिंग चव्हाण, किशोर हानवते, दत्तात्रय कांगणे, नितीन सरकटे, हभप दत्तात्रय महाराज पवार, राम किसन बोडखे, भगवान सरकटे, रवि पाटील, विठ्ठलराव काळे, शरद सरकटे, पोपटराव खंदारे, भागवत मुर्तडकर, मधुकर सरकटे, तहसीलदार सोनाली जोंधळे, दिलीपराव सरकटे, रामजी सरकटे, भगवान मुर्तडकर, अशोक राठोड, गुलाब राठोड, किशोर सरकटे, सिध्देश्वर सरकटे, रामेश्वर देशमुख, गंगाधर मोरे, विश्वनाथसिंग चंदेल, बबनराव सरकटे, शिवाजीराव थोरवे बाबाराव गुंड शरद पाटील भगवान देशमुख सुभाष लाड शशिकांत सरकटे रामकिसन सरकटे भगवानराव खवणे दिलीपराव सरकटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.